# फॉन्टफ्रीडम मायबोली २०१७

फॉन्टफ्रीडम मायबोली २०१७ सॉफ्टवेअर खरेदी केल्याबद्दल आपले आभार. आता आपण आपली सर्व कामे सहजपणे आपल्या घरातल्या संगणकावर आपल्या मायबोली मराठीतून तसेच हिंदीतूनही करू शकाल. आपण आपल्या मित्रांना आणि नातेवाइकांना पत्रे, इ-मेल आणि शुभेच्छापत्रेही पाठवू शकाल.

मायबोली सॉफ्टवेअरचा वापर सुरु करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या सूचना वाचून घ्या. यामुळे आपण आपला मुल्यवान वेळ वाचवू शकाल.

**अत्यंत महत्त्वाची सूचना :** **फॉन्टफ्रीडम इंजिन** हे आमचे यापूर्वी देण्यात येत असलेले सॉफ्टवेअर आता बंद करण्यात आले आहे. हे सॉफ्टवेअर विंडोज ८ आणि १० वर वापरताना अडचणी येत असत. यापुढे आपण **फॉन्टफ्रिडम गमभन** २०१७ हे सॉफ्टवेअर वापरणार आहोत.

**फॉन्टफ्रिडम गमभन २०१७** हे बहुउपयोगी सॉफ्टवेअर आहे. यामध्ये आपण आता कोणतेही युनिकोड फॉन्ट वापरु शकता तसेच आपले परिचित असलेले “मिलेनियम” फॉन्टसुद्धा वापरु शकता. आमचा “इंग्लिश फोनेटिक” हा किबोर्ड आपल्या परिचयाचा आहेच. मराठीत काम करण्यासाठी अत्यंत सोपा असलेला हा किबोर्ड आता आपण युनिकोडमध्ये टाईप करण्यासाठीही वापरु शकता. युनिकोडमधील 'Arial Unicode MS' आणि 'Mangal' हे फॉन्ट आता सर्व संगणकांवर विंडोजबरोबरच आलेले असतात. याचबरोबर इंटरनेटवर अनेक युनिकोड फॉन्टस डाऊनलोडसाठी उपलब्ध आहेत. त्यांची माहिती आम्ही वेळोवेळी www.fontfreedom.com या वेबसाईटवर देतच राहू.

सॉफ्टवेअर इन्स्टॉल करण्यापूर्वी 'Installation-Guide' ही फाईल उघडून संपूर्णपणे वाचा. या फाईलची प्रिंट काढून आपल्यासोबत ठेवा. यामुळे इन्स्टॉलेशन अत्यंत सुलभ होईल. त्याचप्रमाणे `User Manuals (युजर मॅन्युअल्स)` या फोल्डरमधील सॉफ्टवेअरची `युजर मॅन्युअल्स` वाचा किंवा प्रिंट करुन घ्या. सुमारे २०० पानांहून जास्त अत्यंत उपयोगी मजकूर तेथे उपलब्ध आहे.

## फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ – इन्स्टॉलेशन

युनिकोडमध्ये काम करण्याची सोय जरी Windows च्या नव्या आवृत्तींमध्ये असली तरीही त्यात काम करण्यासाठीचे कीबोर्ड क्लिष्ट आहेत. देवनागरीत गोदरेज टाईपरायटर, रेमिंग्टन टाईपरायटर, इनस्क्रीप्ट, फोनेटिक वगैरेसारखे अनेक किबोर्डस प्रचलित आहेत. यातील अनेक किबोर्डस् windows मध्ये उपलब्ध नाहीत.


फॉन्टफ्रीडम हे गेली अनेक वर्षे वापरात असलेले मराठीतील अत्यंत सोपे आणि सुलभ सॉफ्टवेअर आहे. याचा वापर करुन आपण एम एस ऑफिस किंवा कोणत्याही इतर सॉफ्टवेअरमध्ये मराठीत काम करु शकता.

फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ वापरुन आपण आपल्या आवडीचा आणि नेहमीच्या सवयीचा इंग्लिश फोनेटिक हा किबोर्ड मराठीत काम करण्यासाठी वापरु शकता. या सॉफ्टवेअरचा वापर करुन आपण इ-मेल पाठवू शकता, फेसबुकवर लिहू शकता, स्वत:चा ब्लॉगही बनवू शकता. हा किबोर्ड शिकणेही अत्यंत सोपे आहे. केवळ एक तासाच्या सरावाने आपण हा किबोर्ड अत्यंत सराईतपणे वापरु शकाल. यासाठी मदत-पुस्तिका `User Manuals (युजर मॅन्युअल्स)` या फोल्डरमध्ये दिली आहे.

आपण युनिकोड फॉन्टमध्ये एम एस ऑफिस तसेच इंटरनेटवर इ-मेल पाठवणे, फेसबुकवर लिहिणे वगैरे कामे करु शकता. पेजमेकर, फोटोशॉप वगैरेमध्ये युनिकोडमध्ये काम करता येत नाही. यासाठी आपण “मिलेनियम फॉन्टस” वापरु शकता. एम एस ऑफिस अंतर्गत मिळणाऱ्या पब्लिशरसारख्या सॉफ्टवेअरमुळे पेजमेकरसारखी सॉफ्टवेअर वापरण्याची गरजही पडत नाही.

येणाऱ्या काळात आम्ही इतरही किबोर्डस वापरण्याची सोय देणार आहोत. यासाठी आमच्याकडून येणाऱ्या इ-मेल्सवर लक्ष ठेवा. त्याचप्रमाणे इतर भाषांमध्ये काम करण्याची सोयही मिळेल.


**फॉन्टफ्रीडम गमभन २०१७ चे इन्स्टॉलेशन अत्यंत सोपे आहे.**



आपण जी झिप फाईल (ZIP File) डाऊनलोड केली आहे ती सर्वसाधारणपणे आपल्या संगणकावरील डाऊनलोड्स (Downloads) या फोल्डरमध्ये आली असेल. या फाईलचे नाव FontFreedom-Maayboli-May-2017.zip असे असेल.

ही फाईल अनझिप (unzip) करण्यासाठी या फाईलवर माऊसच्या ऊजव्या बटणाने क्लिक करुन Extract to FontFreedom-Maayboli-May-2017 या ऑप्शनने या फाईलला अनझिप करा.

आता या फोल्डरमध्ये आपल्याला खालीलप्रमाणे फाईल्स आणि फोल्डर्स दिसतील.



- FontFreedom GaMaBhaNa 2017 (Folder)
- Fonts (Folder)
- User Manuals (Folder)
- Installation-Guide.pdf (आपण आत्ता वाचत असलेली फाईल)
- readme.txt (फाईल)

फॉन्टफ्रीडम गमभन इन्स्टॉल करण्यासाठी FontFreedom GaMaBhaNa 2017 या फोल्डरमध्ये जा. येथे असलेल्या gamabhana_fontfreedom_2017_setup.exe या फाईलवर क्लिक करा व पुढे येणाऱ्या सुचनांनुसार सॉफ्टवेअर इन्स्टॉल करा.

**अत्यंत महत्त्वाची सूचना :** आपण जर हे सॉफ्टवेअर Windows 7 किंवा त्यापुढील आवृत्तींवर इन्स्टॉल करत असाल तर सॉफ्टवेअर इन्स्टॉल करताना gamabhana_fontfreedom_2017_setup.exe या फाईलवर Right Click करुन Run As Administrator या Option द्वारे इन्स्टॉल करा.

इन्स्टॉलेशन दरम्यान आपल्याला पाच-सहा स्क्रीन्स दाखवले जातील त्यानंतर इन्स्टॉलेशन पूर्ण होईल आणि फिनिश (Finish) हे बटण दाबल्यावर फॉन्टफ्रीडम गमभन सुरु होईल.

आता सर्वप्रथम सुरु झालेले फॉन्टफ्रीडम गमभन बंद करा. यानंतर आपल्या डेस्कटॉपवर आलेल्या फॉन्टफ्रीडम गमभनच्या आयकॉनला Right Click करुन Run As Administrator या Option द्वारे सुरु करा.

आपल्या Desktop वर फॉन्टफ्रीडम गमभनचा Icon दिसत नसल्यास, ज्या ठिकाणी आपण सॉफ्टवेअर इन्स्टॉल केले असेल त्या फोल्डरमधील gamabhana_fontfreedom.exe या फाईलला Right Click करुन Run As Administrator या Option द्वारे सुरु करा. इन्स्टॉलेशन करताना आपण installation path बदलला नसल्यास तो

C:\Program Files\gamabhana_fontfreedom_2017 किंवा




C:\Program Files (x86)\ gamabhana_fontfreedom_2017 असा असेल.

फॉन्टफ्रिडम गमभनच्या पहिल्या स्क्रिनवर आपल्याला काही ऑप्शन्स दिसतील. यात “Register”, “Save Preferences” आणि “Help” हे अगदी वरच्या रांगेत असतील आणि त्याखाली किबोर्ड आणि भाषा निवडण्यासाठी ड्रॉप-डाऊन मेनू असतील.

बाजूलाच “मराठी” आणि “इंग्रजी” यामध्ये किबोर्डची अदलाबदल करण्यासाठी एक गोल आयकॉन असेल. मराठीत काम करताना हा आयकॉन लाल रंगात हवा आणि इंग्रजीसाठी ग्रे रंगाचा हवा. आपण यावर क्लिक करु शकता किंवा स्क्रोल लॉक की चा वापर करु शकता.

आता आपण फॉन्टफ्रीडम गमभन हे सॉफ्टवेअर रजिस्टर करायचे आहे. यासाठी रजिस्टर (Register) या मेन्यूवर क्लिक करा. आता खाली एक फॉर्म उघडेल.




या फॉर्ममध्ये आपला “प्रॉडक्ट आयडी” आपोआपच आलेला असेल. त्याखाली एक रिकामा बॉक्स असेल. आता (Product ID) असे लिहिलेल्या बॉक्सच्या समोर असलेल्या “रजिस्टर” (Register) या बटणवर क्लिक करा. आपण इंटरनेटवर ऑनलाईन असाल तर आपल्याला थेट आमच्या वेबसाईटवरील एका फॉर्मवर नेले जाईल. येथे आपल्याला संपूर्ण माहिती भरुन आमच्याकडे पाठवायची आहे. आपला “प्रॉडक्ट आयडी” या फॉर्ममध्ये आपोआप भरलेला मिळेल. हा फॉर्म संपूर्ण भरुन आमच्याकडे पाठवा. त्यानंतर आपल्याला आपली “युजर की” (User Key) म्हणजेच “पीकेएन” (PKN) इ-मेलने पाठवली जाईल.

“युजर की” म्हणजेच “पीकेएन” आपल्याकडे आल्यावर खालच्या रिकाम्या बॉक्समध्ये तो पेस्ट करा आणि अक्टिव्हेट हे बटण दाबा. आता आपले सॉफ्टवेअर अक्टिव्हेट होईल आणि आपण मराठीत काम सुरु करु शकाल.

आपण इंटरनेटवर ऑनलाईन नसल्यास जेव्हा आपण ऑनलाईन जाल तेव्हा आपण ही प्रक्रिया पूर्ण करु शकता.

प्रॉडक्ट आयडी १४ अंकी असून सुरुवातीच्या २ अंकांनंतर आणि त्यानंतर प्रत्येक ४ अंकांनंतर एक हायफन म्हणजेच डॅश ( - ) असेल. या ३२ मध्ये अंक तसेच अक्षरांचाही समावेश असू शकतो. (उदा. -90-ECC9-A513-6B4C-FEC4 ) ही प्रॉडक्ट की सुरुवातीपासून शेवटपर्यंत संपूर्ण सिलेक्ट करुन कॉपी करुन घ्या.

आपण आमच्या साईटवरील रजिस्ट्रेशन फॉर्म भरल्यानंतर आपल्याला आपला पर्सनल की नंबर जास्तीत जास्त ३ दिवसात मिळेल. आपली गैरसोय होऊ नये म्हणून आपले सॉफ्टवेअर वापरण्याची सोय आपल्याला दिलेली आहे. मात्र रजिस्टर न केलेले सॉफ्टवेअर पाच मिनिटे चालेल व बंद होईल. त्यानंतर ते आपल्याला पुन्हा सुरु करावे लागेल.

आमच्याकडून “युजर की” (User Key) म्हणजेच “पीकेएन” (PKN) आपल्याला मिळाल्यावर आपण पुन्हा एकदा आपल्या डेस्कटॉपवर असलेल्या फॉन्टफ्रीडम गमभनच्या आयकॉनला Right Click करुन Run As Administrator या Option द्वारे सुरु करा आणि रजिस्टर या मेन्यूवर क्लिक करुन फॉर्म उघडा.

आमच्याकडून मिळालेली “युजर की” (User Key) म्हणजेच “पीकेएन” (PKN) आपण “युजर की” (User Key) या बॉक्समध्ये भरुन (Activate) हे बटण दाबून आपले रजिस्ट्रेशन पूर्ण करा. रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यावर शक्यतो फॉन्टफ्रीडम गमभन बंद करुन पुन्हा सुरु करा.

आपण या सॉफ्टवेअरमधील काही सेटिंग्स सेव्ह करुन ठेवू शकता. यामध्ये आपण वापरत असलेला कीबोर्ड आणि आपली भाषा यांचा समावेश आहे.

फॉन्टफ्रीडम गमभन मध्ये अनेक की बोर्डसमध्ये काम करण्याची सोय आहे.

०१ FF EP Unicode.epun - फॉन्टफ्रीडम इंग्लिश फोनेटिक - युनिकोड फॉन्टसाठी

०२ FF EP Millennium.epun - फॉन्टफ्रीडम इंग्लिश फोनेटिक – मिलेनियम आणि आयएलडीव्ही फॉन्टससाठी

०३ gamabhana.epun - गमभन – युनिकोड फॉन्टसाठी

यातील आपल्या पसंतीचा किबोर्ड निवडा तसेच भाषा "मराठी" निवडा आणि सेव्ह (Save) या बटणवर क्लिक करुन ही सेटिंग्स सेव्ह करुन ठेवा.

आता आपण मराठीत संगणकावर टायपिंग करायला तयार झालात.

मराठीतून टायपिंग करण्यासाठी मदत करणारी संपूर्ण मदत-पुस्तिका `User Manuals (युजर मॅन्युअल्स)` या फोल्डरमध्ये दिली आहे. केवळ एक तासाच्या सरावाने आपण फॉन्टफ्रीडम इंग्लिश फोनेटिक हा किबोर्ड अत्यंत सराईतपणे वापरु शकाल.

आपल्याला कोणतीही अडचण आल्यास www.fontfreedom.com या वेबसाईटवरील सपोर्टसाठीचा फॉर्म भरुन आम्हाला पाठवा. किंवा support@cybershoppee.com या इ-मेलवर संपर्क साधा.

कोणत्याही प्रकारच्या संपर्कासाठी आपल्या सॉफ्टवेअरचा डाऊनलोड रेफरन्स क्रमांक आम्हाला कळवा. त्याशिवाय आपल्याला सपोर्ट देणे आम्हाला शक्य होणार नाही. हा क्रमांक आपल्याला डाऊनलोड लिंक ज्या इ-मेलमधून पाठवली त्यात दिलेला आहे. हा क्रमांक अतिशय महत्त्वाचा आहे तेव्हा तो व्यवस्थितपणे नोंद करुन ठेवा.

आपल्या सर्व शंका आणि अडचणींचे निराकरण साधारणपणे जास्तीत-जास्त २४ तासांमध्ये करण्याचा प्रयत्न आम्ही करु.

**संपर्कासाठी पत्ता :**


## सायबरशॉपी

चाणक्य, ३ रा मजला, क्लासिक प्लाझाच्या मागे, गोखले रोड, नौपाडा, ठाणे ४००६०२

**दूरध्वनी :** ०२२-२५४२११८५ (सोमवार ते शुक्रवार – सकाळी १०.३० ते संध्याकाळी ६.०० या वेळात)

**व्हॉटसअप मेसेज साठी :** ९८२०३ १०८०३

**इ-मेल :** support@cybershoppee.com
**वेब साईट :** www.cybershoppee.com / www.fontfreedom.com


Document Version : 01 May 2017

# मराठीसृष्टी डॉट कॉम

- अत्यंत भक्कम वाचकवर्ग. महिन्याला २५० लाखाहून अधिक नेटवर्क पेज व्ह्यूज
- दररोज ८०,००० हून जास्त वाचक. ४,५०,००० सभासद.
- १५ वर्षाहून अधिक काळ कार्यरत.
- नेटवर्कची एकूण वाचकसंख्या दररोज २००००० हून अधिक
- २४ तास कार्यरत असलेला संपादकवर्ग
- तांत्रिकदृष्ट्या भक्कम पायावर उभे. वृत्तपत्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सोयी-सुविधांनी युक्त
- लेखसंग्रह, मराठी व्यक्ती संदर्भ कोश, महासिटीज, खाद्ययात्रा, आरोग्य, मराठी व्हिडिओज, मराठी आडनावकोश हे मुख्य विभाग
- जगाच्या कानाकोपऱ्यातून येणारा नियमित वाचकवर्ग. वाचकसंख्येत सतत भर
- वाचकांना त्यांच्या प्रतिक्रिया तात्काळ लिहून ऑनलाईन पाठविण्याची सोय
- १,००,००० हून अधिक मराठी लेखांचा संग्रह असलेले एकमेव मराठी संकेतस्थळ
- लेखांमध्ये दररोजची भर.
- प्रतिथयश साहित्यिकांपासून सामान्य माणसापर्यंत अनेकांचे लेखन उपलब्ध
- आपले मत स्पष्टपणे मांडण्याची सोय. कोणत्याही प्रकारची सेन्सॉरशीप नाही.
- लेखनासाठी अत्यंत सुटसुटीत नियम व अटी
- लेखनासाठी लेखांच्या विषयानुसार २५ हून अधिक विभाग. नवीन वर्गवारी बनविण्याची सोय.
- मराठी व्यक्ती संदर्भ कोश हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प
- संदर्भ कोशात आतापर्यंत ५०,००० हून अधिक मराठी व्यक्तींची नोंदणी.
- डिसेंबर २०१७ पर्यंतचे उद्दिष्ट **१**००००० मराठी माणसांच्या संदर्भ कोशाचे.
- जाहिरातदारांना विविध प्रकारच्या जाहिरात संधी

याव्यतिरिक्त, मराठीसृष्टीच्या माध्यमातून लेखक आणि पत्रकारांना विशेष सुविधा देण्यात येतात.

- इ-स्टोअरसहित संपूर्ण व्यावसायिक वेबसाईटस-अत्यंत आकर्षक किमतीत.
- लेखकांना व्यावसायिक संधी.
- स्वेच्छानिवृत्तांसाठी आणि सेवानिवृत्तांसाठी आकर्षक व्यावसायिक योजना
- पत्रकारांसाठी स्वत:चे वृत्तपत्र सुरु करण्याच्या आकर्षक योजना...

**मराठीसृष्टी डॉट कॉम (www.marathisrushti.com)**

चाणक्य, ३ रा मजला, क्लासिक प्लाझाच्या मागे, गोखले रोड, नौपाडा, ठाणे ४००६०२

**दूरध्वनी :** ०२२-२५४२ ११८५

**इ-मेल :** support@marathisrushti.com

**वेब साईट :** www.marathisrushti.com